| महाराष्ट्र पोलीस | **प्रसिद्धिपत्रक**<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६<br>फोन नं. ०२०-२६६८५००० | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जा.क्र./पोउआ/वाह/ ११५८ /२०२५ पुणे दिनांक -११/०२/२०२५

पुणे शहरातील फरासखाना वाहतूक विभागांतर्गत कसबा गणपती मंदीर समोरील गावठाणातील सार्वजनिक रोडवर दोन्ही बाजूस मोठ्या प्रमाणात वाहने पार्क होतात, त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होउन रहदारीस अडथळा निर्माण असल्याने वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, फरासखाना वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. "सदर ठिकाणी यापर्वी काही पार्किंग संदर्भात आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे".

## फरासखाना वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

- **शिवाजी रोड वरील कसबा गणपती कमान ते गणेश रोड वरील कसबा गणपती कमान दरम्यान रस्त्यावर पी-१, पी-२ पार्कींग झोन करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ ऐअरपोर्ट रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक –११/०२/२०२५ ते दिनांक –२५/२/२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर.

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** , पुणे शहर.

३)**पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी फरासखाना** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.